आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक  बातमीपत्र - संध्याकाळी ७ वाजता

२७ मार्च २०२४ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत संपली

- लोकसभा निवडणुकीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून १७, तर वंचित बहुजन आघाडीकडून ८ उमेदवारांची पहिली यादी जाहीर

- महायुतीच्या स्टार प्रचारकांमधे नरेंद्र मोदी, अमित शाह, अनुराग सिंह ठाकूर, नितीन गडकरी, एकनाथ शिंदे, देवेंद्र फडनवीस, अजित पवार, रामदास आठवले यांचा समावेश

- राष्ट्रीय तपास संस्थेच्या महासंचालकपदी भारतीय पोलीस दलाचे वरिष्ठ अधिकारी सदानंद दाते यांची नियुक्ती

**आणि**

- मुंबई शेअर बाजाराच्या निर्देशांकात ५२६ अंकांची वाढ

**<><><><><><>**

राज्यातल्या पहिल्या टप्प्यातल्या ५ लोकसभा मतदारसंघात अर्ज भरण्याची मुदत आज संपली. नागपूर, रामटेक, भंडारा-गोंदिया, गडचिरोली-चिमूर आणि चंद्रपूरमध्ये या पाच मतदारसंघात पहिल्या टप्प्यात १९ एप्रिल रोजी मतदान होणार आहे. याठिकाणी उद्या अर्जांची छाननी होईल, शनिवारपर्यंत अर्ज मागे घेता येतील.

**नागपूरमध्ये** भाजपाचे विद्यमान खासदार नितीन गडकरी आणि काँग्रेसच्या विकास ठाकरे यांच्या लढत आहे. वंचित बहुजन आघाडी या मतदारसंघात ठाकरे यांना पाठिंबा देणार आहे.

**रामटेकमध्ये** शिवसेनेचे राजू पारवे आणि काँग्रेसच्या रश्मी बर्वे यांनी अर्ज भरलेत.

**भंडारा-गोंदियात** भाजपाचे विद्यमान खासदार सुनील मेंढे यांनी अर्ज भरला असून काँग्रेसकडून डॉ प्रशांत पडोळे यांनी अर्ज भरला.

**चंद्रपूरमध्ये** राज्यातले वनमंत्री सुधीर मुनगंटीवार आणि काँग्रेसकडून दिवंगत खासदार बाळू धनोरकर यांच्या पत्नी प्रतिभा धनोरकर यांनी अर्ज दाखल केलेत. वंचित बहुजन आघाडीकडून राजेश बेळे यांनी या मतदारसंघातून आज अर्ज भरला.

**गडचिरोली-चिमूरमधून** भाजपाचे विद्यमान खासदार अशोक नेते यांनी तर काँग्रेसकडून नामदेव किरसन यांनी उमेदवारी अर्ज भरला आहे.

**<><><><><><>**

लोकसभा निवडणुकीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं आज १७ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. पक्षासोबत असलेल्या जुन्या खासदारांना तसंच गेल्यावेळी पराभूत झालेल्या उमेदवारांना पक्षानं पुन्हा संधी दिली आहे.

दक्षिण मुंबईतून अरविंद सावंत,
ठाण्यातून राजन विचारे,
रत्नागिरी-सिंधुदुर्गमधून विनायक राऊत,
उस्मानाबाद मधून ओमराजे निंबाळकर आणि
परभणीतून संजय जाधव पुन्हा पक्षाचे उमेदवार असतील.
गेल्यावेळी पराभूत झालेल्या चंद्रकांत खैरे यांना औरंगाबादमधून,
संजय दिना पाटील यांना ईशान्य मुंबईतून, आणि
अनंत गीते यांना रायगडमधून पक्षानं पुन्हा संधी दिली आहे.
वायव्य मुंबई मतदारसंघातले खासदार गजानन किर्तीकर एकनाथ शिंदे

**यांच्यासोबत** गेल्यानं त्यांचा मुलगा अमोल किर्तीकर यांना पक्षानं तिकीट दिलं आहे. गेल्यावेळी शिवसेनेचे १८ खासदार निवडून आले होते. त्यातल्या मुंबई दक्षिण मध्य, नाशिक, बुलडाणा, हिंगोली, शिर्डी, यवतमाळ-वाशिम, मावळ या मतदारसंघातले खासदार एकनाथ शिंदे यांच्यासोबत असल्यानं पक्षानं इथून नव्या उमेदवारांना संधी दिली आहे.

दक्षिण मध्य मुंबईतून अनिल देसाई,
नाशिकमधून राजाभाऊ वाजे,
बुलडाण्यातून नरेंद्र खेडेकर,
हिंगोलीतून नागेश पाटील-आष्टीकर,
शिर्डीतून भाऊसाहेब वाकचौरे,
यवतमाळ-वाशिम मधून संजय देशमुख आणि
मावळमधून संजोग वाघेरे-पाटील हे उद्धव ठाकरे यांच्या पक्षाचे उमेदवार असतील.

**सांगलीमधून** पक्षानं चंद्रहार पाटील यांना उमेदवारी जाहीर केली आहे.
शिवसेनेच्या यादीवर काँग्रेसनं नाराजी व्यक्त केली आहे. मुंबईतल्या काही जागा, सांगली यावर चर्चा सुरू असताना उमेदवारी जाहीर करणं योग्य नसल्याची प्रतिक्रिया काँग्रेस विधीमंडळ पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात यांनी दिली आहे.

**<><><><><><>**

आगामी लोकसभा निवडणुकीसाठी वंचित बहुजन आघाडीनं आज ८ उमेदवारांची यादी जाहीर केली.

त्यानुसार अकोल्यातून वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर, भंडारा-गोंदियातून संजय केवात, अमरावती- -प्राजक्ता पिल्लेवान, चंद्रपूर राजेश बेले, बुलडाणा-वसंत मगर, गडचिरोली हितेश मांडावी, वर्धा- राजेंद्र साळुंके, तर यवतमाळ-वाशिम लोकसभा मतदारसंघातून सुहास पवार वंचित बहुजन आघाडीचे

उमेदवार आहेत.

अकोल्यामध्ये मनोज जरांगे पाटील यांच्याबरोबर काल झालेल्या बैठकीनंतर हा निर्णय झाल्याचं प्रकाश आंबेडकर यांनी बातमीदारांना सांगितलं. आगामी निवडणुकीत ओबीसी समुदायाबरोबर आघाडी होईल, तसंच मुस्लिम आणि जैन समुदायालाही उमेदवारी दिली जाईल, असं ते म्हणाले.

सांगलीमध्ये ओबीसी बहुजन पार्टीतर्फे प्रकाश शेंडगे उभे राहिले तर त्यांना पाठिंबा देऊ तसंच नागपूरमधल्या काँग्रेसच्या उमेदवाराला वंचितनं समर्थन जाहीर केल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. बाकी जागांची अंतिम यादी २ एप्रिलपर्यंत जाहीर होईल असं ते म्हणाले.

**<><><><><><>**

आगामी लोकसभा निवडणुकांसाठी भारतीय जनता पार्टीनं आज आपल्या ४०  स्टार प्रचारकांची  यादी जाहीर केली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, गृहमंत्री अमित शाह, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, माहिती आणि प्रसारण मंत्री अनुराग सिंह ठाकूर, यांच्यासह, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, पियुष गोयल,  तसंच राज्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि अजित पवार, रामदास आठवले, नारायण राणे, रावसाहेब दानवे, अशोक चव्हाण, पंकजा मुंडे, चंद्रकांत पाटील, सुधीर मुनगंटीवार, या नेत्यांचा यादीत  समावेश आहे.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यावर मध्य प्रदेश आणि बिहार या राज्याच्या स्टार प्रचारकाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे, तर देवेंद्र फडनवीस यांचीही मध्यप्रदेश साठी, तर विनोद तावडे यांची  बिहारचे स्टार प्रचारक म्हणून नेमणूक झाली आहे. स्मृती इराणी आणि मनोज तिवारी यांचीही नावं स्टार प्रचारकांच्या यादीत आहेत.

**<><><><><>**

भारतीय पोलीस दलाचे वरिष्ठ अधिकारी सदानंद दाते यांची NIA अर्थात राष्ट्रीय तपास संस्थेच्या महासंचालकपदी नियुक्ती झाली आहे. १९९० च्या तुकडीचे  भारतीय पोलीस सेवेतले हे अधिकारी सध्या महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाचे प्रमुख म्हणून काम पाहत आहेत. मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीनं दाते यांच्या नियुक्तीला ३१ डिसेंबर २०२६  पर्यंत अर्थात त्यांच्या सेवानिवृत्तीपर्यंतच्या कार्यकाळापर्यंत मान्यता दिल्याचं कार्मिक मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

आताच हाती आलेल्या बातमीनुसार भाजपानं विद्यमान अपक्ष खासदार नवनीत राणा यांना अमरावतीमधून संधी दिली आहे. गेल्यावेळी त्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या पाठिंब्यानं निवडून आल्या होत्या. त्यानंतर त्यांनी भाजपाला पाठिंबा दिला होता.
काँग्रेसनं या मतदारसंघातून बळवंत वानखेडे यांना उमेदवारी जाहीर केली आहे.

**<><><><><>**

जागतिक बाजारातल्या मिश्र स्थितीच्या पार्श्वभूमीवर देशाच्या शेअर बाजारात आज दिवसभर तेजीचं वातावरण राहिलं. आज दिवस अखेर शेअर बाजाराचा सेन्सेक्स ५२६ अंकांनी उसळी घेत ७२ हजार ९९६ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी ११९ अंकांनी वधारला आणि २२ हजार १२३ अंकांवर बंद झाला.

**<><><><><>**

सिमी, अर्थात स्टुडंट्स इस्लामिक मुव्हमेंट ऑफ इंडिया या संघटनेवरची बंदी कायम असून, या बंदीबाबत कुणाला हरकत असेल तर त्यांनी ती नोंदवावी असं बेकायदेशीर कारवाया प्रतिबंधक न्यायाधीकरणानं कळवलं आहे. येत्या ९ एप्रिलपर्यंत कोर्ट रुमनंबर १६, दिल्ली उच्च न्यायालय, शेर शाहा रोड, नवी दिल्ली

- ११०५०३ या पत्त्यावर हरकत नोंदवता येईल.

या संघटनेवर २००१ मधे आणि त्यानंतर २०१९ मधे पाच वर्षाकरता बंदी घातली होती. २९ जानेवारी २०२४ पासून ही बंदी आणखी पाच वर्षांसाठी वाढवली आहे.

**<><><><><>**

सियुईटी- युजी- २०२४ साठी ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम तारीख ३१ मार्चपर्यंत वाढवली आहे. उमेदवार आणि इतर संबंधितांच्या विनंतीनंतर हा निर्णय घेतल्याची माहिती युजीसीचे अध्यक्ष एम. जगदेश कुमार यांनी दिली. ही परीक्षा ३८० शहरांमध्ये घेतली जाणार असून यामध्ये भारताबाहेरच्या २६ शहरांचा समावेश आहे.

**<><><><><>**

उजनी धरण उणे ३६ टक्क्यांवर असून बाष्पीभवन,  शेतीसाठी उपसा आणि पाणीपुरवठ्याच्या योजनांसाठी आठ दिवसाला अंदाजे एक टीएमसी इतकं  पाणी संपत आहे. आपल्याकडे जूनअखेर किंवा जुलैमध्ये पाऊस पडतो. त्यामुळे यंदा उजनी धरण तयार झाल्यापासून पहिल्यांदाच उणे ७० टक्क्यांपर्यंत जाईल, अशी सद्य:स्थिती आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज सनराइजर्स हैदराबाद आणि मुंबई  इंडियन्स यांच्यात सामना होणार आहे. हैदराबादच्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय मैदानावर थोड्याच वेळात, म्हणजे साडेसात वाजता हा सामना सुरु होईल.

मुंबई  इंडियन्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण. करायचा निर्णय घेतला आहे.

**<><><><><>**

मध्य महाराष्ट्रात बऱ्याच ठिकाणी, विदर्भ आणि मराठवाड्यात काही ठिकाणी, तर कोकणात तुरळक ठिकाणी कमाल तापमानात सरासरीच्या तुलनेत किंचित वाढ झाली आहे. राज्यात सर्वात जास्त कमाल तापमान अकोला इथं ४१ पूर्णांक ५ दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसांत संपूर्ण राज्यात हवामान कोरडं राहील. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी येत्या ३० मार्च रोजी पाऊस पडेल असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

//<><><><><><>//